ISSN: 2231-5063 IMPACT FACTOR : 4.6052 (UIF) VOLUME - 6 | ISSUE - 11 | MAY - 2017

GOLDEN RESEARCH THOUGHTS

ग्रामीण भागातील मानवी विकासात आरोग्य सेवांची भूमिका

रविकुमार गंगाराम सुर्यवंशी
अर्थशास्त्र , सामाजिक शास्त्र संकुल स्वा.रा.ती.म.विद्यापीठ , नांदेड.

प्रस्तावना

आरोग्य हा आपना सर्वाच्या जिवाळयाचा प्रश्न आहे. आरोग्य हे व्ययक्तीक व सार्वजनिक अस्या दोन स्थरावरील असते योग्य आहार, स्वच्छ राहणीमान, संतुलीत जीवणक्रम, व्यायाम, शरीर आरोग्य इत्यादीचा समावेश व्ययक्तीक जीवणात होतो. सुरक्षित पाणीपुरवठा, सांडपाण्याची योग्य विल्लेवाट, कचऱ्याची योग्य विल्लेवाट लावने इत्यादी कामे सार्वजनिक आरोग्यात होतो. अर्थात व्ययक्तीक व सार्वजनिक असे आरोग्याचे दोन भाग असले तरी त्या दोघाचा परस्पर संबंध असतो. वैद्यीकशास्त्राच्या सामाजिक पैलुचा अभ्यास ही आता वैद्यीकशास्त्राची महत्त्वाची शाखा मानली जाते. आरोग्याचा प्रश्न हा अनेक धाग्या दोऱ्यानी इतर अनेक प्रश्नाशी निगडीत असतो. आणि म्हणून इतर कोणत्याही विषयाप्रमाणे आरोग्याकडे ही बहुज्ञानशाखीय दृष्ट्रीकोणातुन पाहीले पाहिजे.

सशक्त निरोगी समाज जीवणासाठी सार्वजनिक आरोग्य हि एक महत्त्वपुर्ण पायाभूत घटक सुविधा आहे. जगाच्या पाटिवर आरोग्य विषयक कार्यक्रम व सुविधा पोहचवण्याचे काम यंत्रना करत असते. प्राथमिक आरोग्य केंद्रे व त्यांची उपकेंदे देशाच्या काना कोपऱ्यात आरोग्य विषयक सेवा व सुविधा उपलब्ध करण्यात नियोजन काळात दिल्याचे दिसुन येते. कुंटुंब कल्याण, प्रज्यण्य बाब आरोग्य केंद्रे, पल्स पोलीओ कार्यक्रम, आर्थिक दुर्लबलासाठी संजय गांधी निराधार योजना अशा विविध योजना कार्यक्रमाच्या माध्यमाने देशाचा व राज्याचा आरोग्य विषयक दर्जा उंचावण्याचा पर्यत्न होत आहे.

शासकीय आरोग्य यंत्रनेच्या माध्यमातुन लोकांना आरोग्य सुविधा पोहचवण्यासाठी आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभाग अविरत प्रर्यत्न करत आहे. नागरीकाच्या आरोग्याची रक्षण करण्याची जबाबदारी शासणावर आहे. अल्मा या जाहीरनाम्यात प्रस्तापित आणि जागतीक आरोग्य महासभेने स्विकारलेल्या प्राथमिक आरोग्य सेवा पदधतीनुसार साथीचे आजार, मलेरीया, अंधत्व निवारण, कुष्ठरोग निवारण, पोलीओ निवारण, कुटुंब कल्याण, आरोग्य शिक्षण, शालेय आरोग्य कार्यक्रम इत्यादी उपक्रमाव्दारे देशाच्या कानाकोपऱ्यात आरोग्य सेवा पुरवली जाते. शासन खेरीज भारतीय आरोग्य सेवा पुरवण्यामध्ये खाजगी सेवाचा समावेश आहे. तसेच उपचार करण्याचे अनौपचारीक झाले. अनिययंत्रीत वापरण्यात कोण कोणती सेवा पुरवणली कुटल्या पदधतीने पुरवली किती कीमतीला पुरवली यावर काहीही नियंत्रन नसताना. वैद्यकीय सुविधा पुरवीत आहेत. या औपचारीक आणि अनौपचारीक गटाव्दारे आरोग्य सेवा पुरवली जात असताना समाजातील एका कमकुवत गटाला आरोग्य सेवा उपलब्धते बाबत प्रचंड तफावत आहे. सार्वजनिक आरोग्य सेवाच्या वाईट स्थितीमुळे ग्रामीण भागातील आरोग्याची परिस्थीती आनखी वीकट बनली आहे.

आरोग्य म्हणजे काय

आरोग्य किवा तब्येत हा शब्द असा आहे की त्याचा अर्थ काय हे आपल्याला सगळयाला माहित असते पण ते नक्की शब्दात सागता येत नाही. आरोग्य म्हणजे जेव्हा शरीर आणि मन व्यवस्थित असते म्हणजेच कोणताही रोग, आजार किवा वेदना नसतात असेही म्हणता येईल कि जेव्हा शरीर आणि मन हे दोन्ही व्यवस्थीत असतात आणि आपली नेहामीचे कामे नीट,व्यवस्थित पणे करु शकतो. आरोग्य किंवा तब्यत म्हणजे काय तर जेव्हा शरीर मन आणि समाज हे तीनही व्यवस्थित असतात. आरोग्यासाठी शरीरही निरोगी हवे, मनाची उभारनी ही असावी आणि सामाजिक आरौग्याची स्थिती देखील चांगली असावी. चांगली तब्येत किवा आरोग्य म्हणजे नुसता औषधोपचार नाही तर आंनदी आणि

सुखी जीवण शक्य व्हाव अशी शरीराची आणि मनाची अवस्था भक्कम/ धडधाकड शरीर म्हणजे ज्यावेळी शरीर संपुर्ण पणे काम करण्यात योग्य असते. उदा, घरातील कंदील, कंदीलातील कडी, काच किवा वात जास्त करण्याचा क्रु खराब असला तरी तो कंदील आपण वापरु शकतो. पण त्यातला एकांदा भाग बिगडलेला असेल त्यात तो कंदील संपुर्णपणे कार्यक्षम आहे असे म्हणता येईल का? अगदी असच आपल्या शरीराचे पण असते. एकदा अवयव निठ काम करत नसेल तर म्हणजेच तर डोळयाना निट दिसत नसेल, कमी एकु येत असेल, साधे दुकत असतील तर आपण कामे करतच असतो. पण ज्याला हा कोणताच ञास नसतो. तो जास्त आणि चांगले काम करु शकनार नाही का? आरोग्य हि संकल्पना अत्यंत व्यापक अर्थाने उपयोगात आणली जाते. आरोग्य स्थुल मानाने शारीरिक, मानसिक, सामाजिक संतुलनाची स्थिती होय. आरोग्यास असंतुलन निर्माण झाल्यास रोग झडतात. जी व्यक्ती आपली सामाजिक भूमिका सुव्यवस्थित पार पाडण्यासाठी शारीरीक माणसिक दृष्टया सक्षम असते. ती आरोग्य संपन्न मानली जाते. म्हणून कार्यालक योग्यता हा स्वास्थ्याच्या मुख्य निकष आहे.

आरोग्याच्या व्याख्या

१. आरोग्य म्हणजे स्थुल मानाने शारिरीक, मानसिक, सामाजिक संतुलनाची स्थिती होय.

२. जागतीक आरोग्य संघटना

आरोग्याकडे निव्वळ रोगांचा किवा काही अशक्तपणाचा अभाव इतक्या मर्यादीत अर्थाने पाडु नये, तर आरोग्य म्हणजे सपुर्ण उत्तम असी शारिरीक, मानसिक आणि सामाजिक स्वास्थ होय.

WTO

"Helth is a state of complete physical, mental and social well-being and not merely the absence of disease or infirmity."

या सर्व बाबीचा अर्थ असा होतो की, माणवी जीवणामध्ये आरोग्याचे स्थान अत्यत मळत्त्वाचे आहे. व्यक्तीचे आरोग्य चांगले तर जीवण चांगले व सुखी राहील.

उद्देश

१. ग्रामीण भागातील आरोग्याच्या स्थितीचा अभ्यास करणे.
२. ग्रामीण भागातील आरोग्याच्या बदलाचा अभ्यास करणे.
३. ग्रामीण भागातील आरोग्याच्या सुविधांचा अभ्यास करणे.

गृहितके

१. ग्रामीण भागातील आरोग्याच्या सुविधामध्ये वाढ होणे गरजेचे आहे.
२. ग्रामीण भागातील आरोग्य सुविधामध्ये वेळोवेळी बदल होताना दिसून येतो.
३. ग्रामीण भागातील आरोग्य केंद्रातील पायाभूत सुविधामध्ये सुधारणा करणे गरजेचे आहे.

संशोधन पदधती :

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम साधन सामुग्रीवर आधारीत साधनाचा वापर करण्यात आला असून त्यामध्ये संदर्भ ग्रंथ, विविध मासिकातील तज्ञांचे लेख, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी व इंटरनेट इत्यादी साधनाचा आधार घेण्यात आला आहे.

भारतातील आरोग्याची स्थिती

जागतीक आरोग्य संघटनेची स्थापना ७ एप्रील १९४८ रोजी झाली. दोन वर्षानंतर म्हणजे ७ एप्रील १९५० पासुन हा दिवस जागतीक आरोग्य दिन म्हणून पाळला जातो. ६८ वर्षापासुन या संघटनेतर्फे जागतीक स्थरावर आरोग्य समस्येच्या प्राथमिकते बाबत विचार करुन दरवर्षी जगाला एक संदेश दिला जातो. या संघटनेची अपेक्षा आहे की ज्या त्या देशाची आरोग्य सेवे सबंधीत जगभरातील सर्वानी हा संदेश विविध पदधतीने सामान्य मानसापर्यंत पोहवावा. संदेशात सुचीत केल्या प्रमाणे सामान्य माणसाची ती आरोग्य विषयक समस्या नेमकेपणाने कशा सोडवता येईल यासाठी संबंधीत देशानी प्रयत्नशील राहवे.

भारतात १९८३ ला राष्ट्रीय धोरणाची आखणी करण्यात आली त्यात पायाभूत सुविधाचा विकास, प्राथमिक आरोग्य देखभाल आणि आरोग्य देखभाल आणि क्षेञात तज्ञ व प्रशिक्षीत व्यक्तीचा विकास या ञीसुञीवर भर देण्यात आला. पंरतु उददीष्ट साध्य करण्यासाठी लागणारे स्ञोत कोणते याचा त्यात विचार न झाल्याने हे धोरण निव्वळ व्हिजन डॉक्युमेंटच ठरले. राष्ट्रीय आरोग्य धोरण घोषणापञ १९८३ मंजुरीनंतर सर्वासाठी आरोग्य या घोषनेतील दिशानिर्देश भारत सरकारने अधिकृत धोरण बनले. सदृष्ट राष्ट्र ही संकल्पना साकारण्याच्या वाटचालीत आरोग्य क्षेञासाठी दरवर्षी वाढीव आर्थिक तरतुदीची मागणी हे धोरणकर्त्या समोर नेहमीच मोठे आव्हान ठरले आहे. दुसरीकडे आर्थिक वृध्दी आणि चांगले आरोग्य एकमेकाशी निगडीत असल्याच्या बाबीवर तज्ञानीही शिक्कामोर्तब केले आहे. आरोग्य विषयक गंभीर समस्या असलेले नागरीक देशाच्या विकास प्रक्रीयचा भाग बनु शकत नाहीत. मुळात आरोग्य समस्या देशाच्या विकास उददीष्टे आणि नंतरचा शाश्वत विकास

उददीष्टामध्ये ही बाब मान्य करण्यात आली होती. आणि आरोग्य विषयक उददीष्टाचा त्यामध्ये समावेश करण्यात आला होता. भारताने शाश्वत आरोग्य अददीष्टाना दिली असल्यामुळे ती उद्दीष्ट गाठण्यासाठी योग्य धोरण आणि आरोग्य विषयक प्राथमिकता ठरवण्याची आता गरज आहे. त्याच बरोबर आणि महत्त्वाचे म्हणजे आरोग्य क्षेत्रासंबधी धोरणे कृती आणि इतर क्षेत्रातील विकास कार्यक्रम यामध्ये योग्य तो ताळ मेळ आणि समन्वय राखण्यासाठी लक्ष पुरवावे लागते.

इ.स.२००० मध्येही सहस्त्रकांनी घोषणा आणि त्याअंतर्गत जागतीक स्तरावर ठरवण्यात आलेले आरोग्याशी निगडीत असंख्य सहस्त्रक विकास उद्दीष्टे यातुन प्रेरणा घेत २००२ मध्ये नवीन राष्ट्रीय आरोग्य धोरणाची आखणी करण्यात आली राष्ट्रीय आरोग्य २००२ मध्ये 'सर्वासाठी आरोग्य' हे साध्य करण्याच्या अडचणी स्पष्ट पणे जाणुन घेण्यात आल्या आणि त्यानुसार लोकांचे जीवणमान उंचावण्यासाठी अधिकाअधिक वास्तवदर्षी दृष्ट्रीकोण अंगीकारण्यात आला. लोकांचे जीवणमान उंचावण्याचे लक्ष साध्य करण्यातील उपअनुकुलीत स्त्रोत्राची कमतरता हा प्रमुख अडसर असल्याने यातुन लक्षात आले. त्यात असे सुचवण्यात आले होते, की १० वर्षाच्या कालावधीदम्यान आरोग्य देखभालीवरील खर्च राष्ट्रीय सकल उत्पनाच्या एक टक्यावरुन दोन अक्यापर्यंत वाढला जावा प्राथमिक आरोग्य देखभालीवर किमान ५० टक्के खर्च केला जावा अशी सिफारही त्यामध्ये करण्यात आली होती. प्रथमच पुढील दहा वर्षात आरोग्य क्षेत्रातील कोणती उद्दीष्टे गाठायची आहेत, याचे स्पष्ट चित्र त्यात मांडण्यात आले होते.

२०१४ सालचा नवा राष्ट्रीय आरोग्य धोरणाचा मसुदा अनेक अर्थाने वेगळा आहे. या धोरणा बाबत सरकारने पारदर्शी धोरण राबवले आहे. म्हणजे सामान्य नागरीक तसेच तज्ञाकडुन अधिकाअधिक सुचना याव्यात यासाठी धोरणाचा मसुदा 'पब्लिक डोमेन' मध्ये अपलोड करण्यात आला आहे. अनेकार्थानी आरोग्य क्षेत्रात बदल होतील अशी शक्यता या मसुदयात गृहीत धरण्यात आली आहे. महत्त्वाचे म्हणजे आरोग्य देखभालीचा खर्च दिवसेन दिवस वाडत असल्याने आणि ग्रामीण भागातील गरीबी या घटकाचा मोठा समावेश आहे. धोरणानूसार असे "औषधाच्या वाढत्या किमती वैद्यकीय खर्चात सातत्याने वाढ होत आहे. अशा परीस्थितीत एखांदया कुटुंबाचे उत्पन्न कमी होउ शकते. हे रोखले जावु शकते. व प्रत्येक सरकारी योजनेचे उद्दीष्ठ गरीबीचे उच्चाटन हे असते" त्यात असेही नमुद करण्यात आले की, अनेक कुटुबांना घराना [२००४-०५मधील १५ टक्याच्या तुलनेत २०११-१२ मध्ये १८ टक्के] आरोग्यावर प्रचंड खर्च करावा लागला.त्यात असेही म्हटले आहे की, सर्व्हीस डीलीवरीमध्ये झालेली वाढ निवडक प्रजोत्पादन आणि बाल आरोग्य सेवाशी निगडीत होती. आणि राष्ट्रीय रोग नियंत्रक कार्यक्रमाशीही सलग्न होती. तसेच सामान्य लोकांच्या ग्रामीण भागातील आरोग्याचे सर्वधन व्हावे यासाठी लागणाऱ्या दृष्ट्रीकोनाचा त्यात अभाव होता. मसुदा धोरणात संसर्गजन्य आजार आणि मातृत्व व बाळाच्या जन्मानंतरचे आजार ते असंसर्गजन्य आजार व दुखापती यांच्यावर जास्त भर देण्यात आला.

सांराश

ग्रामीण भागातील आरोग्य सुविधाचे स्थान मानवी जीवनात महत्वाचे स्थान मानले जाते त्यामुळे मानवी विकासा बरोबर देशातील अर्थव्यवस्थेमध्ये वृध्दी घडून आणणारा घटक आहे. आरोग्य सुविधामुळे व्यक्तीचा सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकास होत असेल तरच अर्थव्यवस्थेमध्ये वृध्दी झालेली दिसून येईल विकसित अर्थव्यवस्थेमध्ये आरोग्य सुविधांची मोलाची भूमिका असते. शैक्षणिक बदल, समाजातील अस्थिरता, आर्थिक प्रगती, सामाजिक बदल व सांस्कतीक विकास या घटकाची प्रगती झाली तर विकासाचे प्रारुप एक आदर्श आरोग्याकडे आपण वाटचाल करु शकतो. तरच आरोग्य सुविधांच्या घटकाबरोबर निरोगी आरोग्याकडे वाटचाल करेल.

संदर्भ

१. रुडोल्फ विरचोवो - अरोग्य आणि समाज - पहिली आवृत्ती - १९९६-९७
२. डॉ. अरविंद गोडबोले - आरोग्याचे सामाजिक, राजकीय व आर्थिक संदर्भ - पहिली आवृत्ती -१९९७
३. डॉ. अरविंद गोडबोले - आरोग्याचे सामाजिक, राजकीय व आर्थिक संदर्भ - पहिली आवृत्ती - १९९७
४. भारत २०१२ - वार्षिक संदर्भ ग्रंथ - प्रकाशन विभाग- सुचना और प्रसारण मंत्रालय भारत सरकार
५. योजना मासिक -फेब्रुवारी २००६
६. अर्थ व सांख्यिकी संचालनालय -महाराष्ट्राची आर्थिक पाहणी नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई २०१३-१४
७. http://marathivishwakosh.in

रविकुमार गंगाराम सुर्यवंशी
अर्थशास्त्र , सामाजिक शास्त्र संकुल स्वा.रा.ती.म.विद्यापीठ , नांदेड.